जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478


# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१३/०७/२०२३
## दि.१२/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे ११२/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४ महा.पो.का.क.३७(१) १३५ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ३७ वर्षे रा.शास्त्रीनगर,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | संकेत शहाजी म्हस्के वय २६ वर्षे रा.संत गाडगे महाराज वसाहत, कोरेगाव पार्क, पुणे (अटक ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०७/२०२३ रोजी स.०७/०० वा. बर्निंग घाट,स्मशान भुमीच्या गेट समोर,कोरेगाव पार्क,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद इसम हा ओळखीचा असुन,तु मला भेटत का नाही असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करुन लाकडी दांड्याने तीचे डाव्या हाताचे कोप-यावर,कानावर डोक्यावर जोरात मारुन फिर्यादीस जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश वराळ ९७६४२६८९९६ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४५८/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ३७ वर्षे रा.गोकुळनगर,कात्रज, पुणे |
| **आरोपीत** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/०६/२०२३ रोजी ११/०० वा.कात्रज चौक ते जुन्या कात्रज बोगदयाचे पलीकडे घाट उतरल्या नंतर डोंगर भागाकडे जाणा-या कच्च्या रस्त्यावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्याची सहकारी महिला यांना नमुद इसमांनी कात्रज चौका जवळून कामासाठी चला असे सांगून,त्यांना प्रवासी चारचाकी गाडीतून जुन्या कात्रज बोगदयाचे पलीकडे घेऊन जाऊन,सदरची प्रवासी गाडी निघुन गेल्यावर फिर्यादी व सोबतच्या सहकारी यांना कामाच्या ठिकाणी चला असे म्हणून डोंगराकडे जाणारे कच्च्या रस्त्यावर घेऊन जाऊन,त्यांचेकडील सोन्याचे दागिने व रोख रक्कम,मोबाईल असा एकुण ७६,०००/- रुपये किंमतीचा ऐवज जबरदस्तीने घेवुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. अमोल रसाळ ९९२३४०८७६७ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५६१/२०२३,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ५८ वर्षे रा.वाडे-बोल्हाई रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०७/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. ते १९/०० वा.चे दरम्यान सावित्री अपार्टमेंट,फ्लॅट नंबर २०२, दुसरा मजला,सरकार हॉटेल समोरील लेन मध्ये,केसनंद वाडे-बोल्हाई रोड, ता.हवेली, जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख रक्कम महित नाही व सोन्याचे दागिने असा एकुण २,६०,०००/- रुपये किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.गजानन जाधव ९८२२७४२३३३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २९६/२०२३,भादविक २७९,३०४(अ) मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | निखिल सोनार, पोलीस अंमलदार, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | राधाकृष्णण मुरुगेश,वय ३५ वर्षे रा.जीट्टानढाहाली, जि.धरमपुरी राज्य.तमिळनाडु (अटक ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०७/२०२३ रोजी १७/३० वा.मुंबई-बेंगलोर हायवे माई मंगेशकर हॉस्पीटल जवळ हायवे रोडवर हिरो शो-रुम समोर वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,त्यांचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने,नमुद ठिकाणी दक्षिण बाजुकडुन उत्तर बाजुस पायी मुंबई-बेंगलोर हायवे रोड ओलांडणारा पादचारी इसम बाबासाहेब देवराम उदावंत,वय-५५ वर्षे रा. मानाजीनगर,न-हेगाव,पुणे यास धडक देवून,त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्यूस कारणीभूत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.रायकर ९८७४५६३२१ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे २३०/२०२३,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | संतोष कांबळे, वय ४३ वर्षे,रा.मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | डंपरवरील चालक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०७/२०२३ रोजी दु.१४/११ वा.महात्मा फुले चौक,मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची आई लिला देवप्पा कांबळे,वय-६५ वर्षे,रा.सर्वोदय,कॉलनी,मुंढवा,पुणे ह्या सदर ठिकाणाहुन पायी जात असताना,नमुद इसमाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी लिला कांबळे यांचे अंगावर डंपरचे डावे बाजूचे दोन्ही चाके घालुन,त्यांना गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. काटे ९९२३३६०९६६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**